# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 12 June 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
# **प्रादेशिक बातम्या**
# **दिनांक – १२ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- गुजरातच्या अहमदाबादहून लंडनकडे उड्डाण केलेल्या विमानाचा भीषण अपघात–बचावकार्य सुरू
- वित्तीय संस्थांवरील सायबर हल्ले रोखण्यासाठी राज्य सहकारी बँकेकडून सायबर सेक्युरिटी ऑपरेशन सेंटरची उभारणी
- एसटी महामंडळाचं खाजगीकरण होणार नाही–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची स्पष्टोक्ती

आणि

- परभणी जिल्ह्यात विकसित कृषी संकल्प अभियानाचा समारोप

****

गुजरातच्या अहमदाबाद इथं आज विमानाचा भीषण अपघात झाला. अहमदाबादहून लंडनला जाण्यासाठी उड्डाण केलेलं एअर इंडियाचं प्रवासी विमान अवघ्या काही सेकंदात विमानतळाजवळच्या मेघानी नगर भागात वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात कोसळलं. नागरी उड्डाण महासंचालनालयाच्या माहितीनुसार, विमानात दोन वैमानिक आणि १० कर्मचाऱ्यांसह एकूण २४२ प्रवासी होते. प्रवाशांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह एकशे एकोणचाळीस भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश नागरिक, एक कॅनेडियन नागरिक तर ७ पोर्तुगीज प्रवासी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. अपघातस्थळी अग्निशमन दल आणि पोलिसांसह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकांनी बचावकार्य सुरु केलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. या हृदयद्रावक दुर्घटनेमुळे प्रभावित झालेल्या सर्वांसोबत आपल्या सहवेदना आणि प्रार्थना असून,

या दुःखाच्या काळात संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा असल्याचं, राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुखं व्यक्त केलं आहे.

या अपघाताच्या पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू अहमदाबाद इथं दाखल झाले आहेत. अपघाताच्या सर्व तपशीलांबाबत समन्वयासाठी मंत्रालयात एक नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली आहे.

****

वित्तीय संस्थांवरील सायबर हल्ल्यांचं वाढलेलं प्रमाण पाहता राज्य सहकारी बँकेने सायबर सेक्युरिटी ऑपरेशन सेंटरची उभारणी केली आहे. वाशी इथं उभारण्यात आलेल्या या केंद्राचं उद्या शुक्रवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनासकर यांनी ही माहिती दिली. सहकार सुरक्षा या नावाने हे केंद्र असून, राज्यातल्या सहकारी बँका आणि पतसंस्थांना कोणताही मोबदला न घेता ही सुरक्षा सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. संगणकीय माहितीचे कृत्रिम बुध्दिमत्तेच्या माध्यमातून विश्लेषण करणं, संशयित व्यवहारांवर लक्ष ठेवणं, भविष्यातील धोके टाळण्यासाठी कार्यक्रमांची आखणी करणं, आदी कामं या केंद्रातून होणार आहेत.

****

आंतरराष्ट्रीय योग दिन येत्या २१ तारखेला साजरा होणार आहे. या दिवशी सकाळी साडे सहा ते ७ वाजून ४० मिनिटं या वेळेत एक लाखाहून अधिक योग कार्यक्रम एकाच वेळी आयोजित केले जातील, अशी घोषणा केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. ते आज नवी दिल्लीत बोलत होते. यंदाची योग दिनाची संकल्पना एक पृथ्वी – एक स्वास्थ के लिए योग अशी आहे. यंदाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशात विशाखा पट्टणम इथे होणार असून या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सुमारे ४० देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत, अशी महिती जाधव यांनी दिली. या विशेष योग संगमासाठी देशभरातल्या ६५ हजारांहून अधिक संघटनांनी नोंदणी केली आहे.

दरम्यान, योगदिनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही दररोज एका आसनाबाबत श्रोत्यांना माहिती देत आहोत, छत्रपती संभाजीनगर इथल्या योग प्रशिक्षक डॉ अर्चना देशमुख यांनी पर्वतासनाविषयी दिलेली माहिती आज आपण जाणून घेऊया –

**बाईट – डॉ.अर्चना देशमुख, योगशिक्षक**

****

राज्यात यंदा १० कोटी तर पुढच्या वर्षी २५ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबवला जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज अकोला इथं ही माहिती दिली. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढावं, याबाबत राज्य शासनाने पुढाकार घेतला असून कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रयोग शेतीत केले जाणार आहेत, असं पवार म्हणाले.

****

राज्य परिवहन- एसटी महामंडळाचं खाजगीकरण होणार नाही, असं परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. एसटी महामंडळ तोट्यातून नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, खाजगी भाडेतत्त्वावरच्या बस रद्द करण्यात येत असून, लवकरच महामंडळाच्या स्वतःच्या ५ हजार बसेस येणार आहेत, असं सरनाईक यांनी सांगितलं. दरम्यान, धाराशिव शहरातली १४० कोटींच्या रस्त्यांची निविदा रद्द करण्यात आली असून फेरनिविदा काढण्याचे राज्य सरकारने आदेश दिल्याची माहीती, सरनाईक यांनी दिली.

****

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरला जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी यात्रा काळात राज्य परिवहन महामंडळ ५ हजार २०० विशेष बस सोडणार आहे, कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केली तर पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून बस उपलब्ध करून देण्यात येईल. यात्राकाळात पंढरपूरमध्ये चार तात्पुरती बस स्थानकं उभारण्यात येणार आहेत.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्ह्यातून आषाढी यात्रेसाठी पंढरपूरकडे मार्गस्थ होणाऱ्या पालख्यांसोबतच्या वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे, राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. या निधीतून वॉटरप्रूफ मंडप, स्वच्छतागृहं, पिण्याचं पाणी, वैद्यकीय सुविधा पुरवल्या जाणार आहेत. जिल्ह्यातून दरवर्षी सुमारे १६० स्थानिक पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात.

****

प्राचीन वास्तुंचे विद्रुपीकरण होऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची गरज मराठवाडा प्राचीन वस्तु संवर्धन समितीने व्यक्त केली आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं, समितीची बैठक घेण्यात आली. ज्येष्ठ अभ्यासक डॉ. प्रभाकर देव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मराठवाड्यातल्या १३ व्या शतकापर्यंतच्या प्राचीन वास्तुंचे सर्वेक्षण तसंच दस्ताऐवजीकरण करून ग्रंथरूपात आणणं, शासकीय पुरातत्व खात्या शिवाय स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, इंटॅकसारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थांकडे या कामांचा पाठपुरावा करणे, बारवांचं काम हाती घेतल्यावर यातील पाण्याचा वापर कसा नियमीत करता येऊ शकेल हे पाहणे, प्राचीन वास्तु स्थळांवर सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करणं यासह अनेक ठराव यावेळी संमत करण्यात आले.

****

नवीन विकसित झालेलं पिकांचं वाण आणि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी परभणी कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने विकसित कृषी संकल्प अभियान राबवण्यात आलं. आज या अभियानाचा परभणी जिल्ह्यातल्या पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथं समारोप करण्यात आला. विद्यापीठाने विकसित केलेल्या नव्या कापूस वाणाची माहिती तसच झाडांची संख्या वाढवून झाडांची उंची कमी करण्याचे तंत्रज्ञान, कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी गळ फांदी काढून टाकणे, खत आणि किटकनाशक फवारणी व्यवस्थापन याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ.खिजर बेग यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – डॉ.खिजर बेग**

****

बीड जिल्ह्यात मस्साजोग इथले दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज भेट घेतली. मृत देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख हिने बारावीच्या परीक्षेत संपादित केलेल्या यशाबद्दल सरनाईक यांनी तिचं कौतुक करत, तिला लॅपटॉप भेट दिला. आर्थिक अडचणीमुळे वैभवीच्या शिक्षणात कुठेही खंड पडणार नाही, याची जबाबदारी आपण स्वतः घेत असल्याची ग्वाही सरनाईक यांनी दिली.

****

गडचिरोली इथं काँग्रेस पक्षाच्या वतीने शेतकरी न्याय यात्रा काढण्यात आली. काँग्रेस पक्षाच्या प्रदेश समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या यात्रेला संबोधित केलं. दरम्यान, अहमदाबाद इथं आज झालेल्या विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ही यात्रा दोन दिवस स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

****

बीड इथं आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. राज्य सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पाळली नाहीत, युती सरकारला त्यांच्या घोषणाची आठवण करून देण्यासाठी आंदोलन करण्यात आल्याचं आंदोलकांकडून सांगण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात काल झालेल्या दुर्घटनेबाबत आज महानगर पालिका कर्मचाऱ्यांच्या फिर्यादीवरुन कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलां आहे. काल या उद्यानाची कमान कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला होता.

****

बीड जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शंभर टक्के विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके आणि गणवेशासह पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्याचं आवाहन जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी केलं आहे. आज बीड इथं घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. दरम्यान, एकही शाळा तसच विद्यार्थी या लाभापासून वंचित राहिला तर यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

****